**फिर्यादीचा पुढील सरतपास वकील श्री. प्रविण म्हात्रे यांचेमार्फत :**

१०. माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. निशाणी क्र. ४/ड सोबत मी आरोपीने दिलेला धनादेश दाखल केलेला आहे. त्यावर आरोपीची सही आहे. तो चेक त्याने दिला होता. त्यास **निशाणी क्र. २५** देण्यात येते.

११. आरोपीने दिलेला चेक बॅंक ऑफ बडोदा, अलिबाग येथे वटण्याकरीता जमा केला असता सदरचा चेक न वटता परत आल्याचा मेमो दाखल केलेला आहे. त्यास **निशाणी क्र. २६** देण्यात येते.

१२. आरोपीला पाठवलेल्या नोटीसची स्थळप्रत मी दाखल केलेली आहे. त्यावर माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २७** देण्यात येते.

१३. आरोपीला रजिस्टर पोस्टाने पाठविलेल्या नोटीसची पोस्टाची पावती दाखल केलेली आहे. त्यास **निशाणी क्र. २८** देण्यात येते. पोस्टाची पोचपावती दाखल केलेली असून त्यास **निशाणी क्र. २९** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. सुधीर पाटील यांचेमार्फत** :

आरोपी व वकीलांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर **सबब उलटतपास नाही**.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **१६/१२/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.